तरुण भारत
नागपूर, रविवार, दि.१८ जुलै २०२१

# संत साहित्य हे मूल्य रुजविण्याचे प्रभावी माध्यम

## इंद्रजित भालेराव यांचे प्रतिपादन

◆ वाशीम, १७ जुलै

संत साहित्य हे मूल्य रूजविण्याचे प्रभावी माध्यम आहे. समाजात राष्ट्र, प्रेम व मानवता रूजविण्यासाठी हे महत्वाचे आहे. नकारातून सकारात्मक स्थितीत जाता येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे आहेत. धर्म जेव्हा कालबाह्य होत होते तेव्हा वारकरी संप्रदायांच्या विचारांनी याला पुनर्जीवन दिले आहे. असे प्रतिपादन विचार संत साहित्याचे गाढे अभ्यासक व कवी इंद्रजित भालेराव यांनी केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे’च्या दुसऱ्या दिवसाच्या ‘वारकरी संप्रदाय विचार आधुनिक की कालबाह्य?’ या विषयावरील द्वितीय सत्रात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी विद्यावाचस्पती व संत साहित्याचे गाढे अभ्यासक रविदास महाराज शिरसाठ हे होते. यावेळी कीर्तनकार अॅड. जयवंत महाराज बोधले, संत एकनाथ महाराज यांचे वंशज योगिराज महाराज गोसावी, प्रवचनकार उद्धव महाराज मंडलिक, भागवताचार्य हरिहर महाराज दिवेगावकर, माधवदास महाराज राठी आणि प्रसिद्ध पखवाज वादक उद्धवबापू आपेगावकर हे उपस्थित होते.



तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, डॉ. संजय उपाध्ये व रवींद्रनाथ पाटील हे उपस्थित होते. धर्म तेव्हाच कालबाह्य होतो जेव्हा अनुयायी त्याचे पालन करीत नाही. आपण इतिहास लिहिला नाही, त्यामुळे यात दुरूस्त करून महाराष्ट्राला कालसंगत केले पाहिजे. महादेव गोविंद रानडे यांनी आपल्या ग्रंथात प्रथम संतांचे विचार मांडले. त्यांनी समाज गतिशील केला. ग.बा.सरदार यांनी आपल्या लेखणीतून हा धर्म आधुनिक केला. तुकाराम महाराजांचे विचार आधुनिकतेला कसे जोडणारे आहे असे इंद्रजित भालेराव म्हणाले.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,वारकरी संप्रदायाचा विचार कालबाह्य होणार नाही. आजच्या काळात या संप्रदायाची खूप गरज आहे. आता हा विचार भारतीय सीमा ओलांडून जगभर पोहोचविण्यासाठी ही परिषद आहे.

हरिहर महाराज दिवेगावकर म्हणाले,आज विज्ञानामुळे प्रगती झाली असून मानवाचे जीवन सुखमय झाले आहे. तरी मनुष्याचे मानसिक आरोग्य बिघडले आहे. शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी संत साहित्य आवश्यक आहे. उद्धव बापू आपेगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. अतुल कुलकर्णी यांनी संचालन केले.डॉ. मिलिंद पत्रे यांनी आभार मानले. ◂(तभा वृत्तसेवा)